**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,**
पुणे महानगरपालिका
जावक क्र. अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/ ५९३५
दिनांक :- १५/०९/२०२१

## - आदेश -

**विषय :-** श्री. संजीव ओहोळ, मुख्याधिकारी गट-ब यांना महापालिका सहाय्यक आयुक्त, पुणे महानगरपालिका (वर्ग-१) या पदावर प्रतिनियुक्तीने रुजू करून घेणेबाबत.

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन आदेश क्रमांक: एमसीओ-२०२१/प्र.क्र.१५३/नवि-१४, दिनांक ०८ सप्टेंबर २०२१.

२) श्री. संजीव ओहोळ, मुख्याधिकारी यांचा दिनांक १३/०९/२०२१ चा अर्ज.

३) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. १/१४२, दिनांक १४/०९/२०२१.

श्री. संजीव ओहोळ, मुख्याधिकारी गट-ब यांची 'सहाय्यक आयुक्त, पुणे महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीने संदर्भ क्र. १ च्या शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे. श्री. संजीव ओहोळ, मुख्याधिकारी यांनी सहाय्यक आयुक्त पदावर रुजू करून घेणेस मा. महापालिका आयुक्त यांजकडेस संदर्भ क्र. २ अन्वये विनंती केली आहे.

श्री. संजीव ओहोळ, यांना पुणे महानगरपालिकेकडील सहाय्यक आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने दिनांक १३/०९/२०२१ रोजी मध्यान्हपूर्व रुजू करून घेण्यात येत असून त्यांचेकडे 'सहाय्यक आयुक्त, सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय' या पदाचा पदभार सोपविण्यात येत आहे.

श्री. संजीव ओहोळ यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार वेतन व भत्ते नियुक्तीच्या विभागाने अदा करावेत.

उपरोक्त कार्यालयीन आदेशाची नोंद घेऊन संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजवीज करावी.

Raut
(रविंद्र बिनवडे)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका

**प्रति :-** १) मा. अवर सचिव (नवि-१४), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.

**प्रत :-** १) खातेप्रमुख (सर्व), पुणे महानगरपालिका
२) श्री. संजीव ओहोळ, महापालिका सहाय्यक आयुक्त, पुणे महानगरपालिका.